**AM/NS INDIA**

आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया

**एएमएनएस गांधीधाम लिमिटेड**
**कॉर्पोरेट ओळख क्रमांक:** U27100MH2004PLC144559
**नोंदणीकृत कार्यालय:** 6 वा आणि 7 वा मजला, रहेजा टॉवर्स, प्लॉट सी 30, ब्लॉक जी, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र - 400051, भारत
**ई-मेल:** cs.amnsgandhidham@amns.in

## फॉर्म क्र. CAA 2

**[कंपनी कायदा, 2013 च्या कलम 230 (3) आणि कंपनीच्या नियम 6 प्रमाणे (तडजोड, व्यवस्था आणि एकत्रीकरण) नियम, 2016]**
**माननीय नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल, मुंबई खंडपीठासमोर, मुंबई येथे**
**कंपनी अर्ज (CAA) क्र. 2024 चा 5**

कंपनी कायदा, 2013 च्या बाबतीत;

आणि

कंपनी कायदा, 2013 च्या कलम 66 आणि कंपनी (तडजोड, व्यवस्था आणि एकत्रीकरण) नियम, 2016 आणि कंपनी कायदा, 2013 च्या इतर लागू तरतुदींसह लागू कलम 230 ते 232 च्या बाबतीत;

आणि

एएमएनएस गांधीधाम लिमिटेड, आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया लिमिटेड आणि त्यांच्या संबंधित भागधारकांमध्ये एकत्रीकरण आणि व्यवस्था करण्याच्या योजनेच्या बाबतीत

**एएमएनएस गांधीधाम लिमिटेड**
(सीआईएन: U27100MH2004PLC144559)
कंपनी कायदा, 1956 अंतर्गत नोंदणीकृत कंपनी
ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय येथे आहे:
6 वा आणि 7 वा मजला, रहेजा टॉवर्स
प्लॉट सी 30, ब्लॉक जी, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स,
वांद्रे (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र - 400051, भारत;

**...अर्जदार कंपनी / एकत्रीकरण कंपनी / हस्तांतरण कंपनी**

**भागधारकांच्या बैठकीची सूचना आणि एएमएनएस गांधीधाम लिमिटेडच्या असुरक्षित कर्जदारांच्या बैठकीची जाहिरात**

हे **सूचना** याप्रकारे दिले जात आहे ज्या संदर्भात आदेश दिनांक 23 फेब्रुवारी 2024 प्रमाणे, जो सुधारित करुन दिनांक 13 मार्च 2024 ला दिला गेला **("आदेश")**, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई बेन्च (द **"ट्रिब्यूनल"** किंवा **"एनसीएलटी")** यांनी निर्देश दिला आहे की एक वेगळी बैठक भागधारक आणी असुरक्षित कर्जदारांसाठी केली जावी जे ए एम एन एस गांधीधाम लिमिटेड संबंढी असून, यासंबंधी प्रयोजन, जर उपयुक्त असल्यास यात एकत्रीकरण आणि व्यवस्था योजनेत बदल (योजना) जे ए एम एन एस गांधी धाम लिमिटेड कडून **("एकत्रीकरण कंपनी"/ "हस्तांतरण कंपनी")**, आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंन्डिया लिमिटेड **("एकत्रित होणारी कंपनी" / "हस्तांतरित होणारी कंपनी")** आणि त्यांचे सन्माननीय भागधारक कलम 230-232 प्रमाणे ज्यांना कलम 66 आणी इतर कलमांसह वाचावे जे कंपनी अधिनियम, 2013 **("अधिनियम")** प्रमाणे लागू आहेत.

उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने आणि त्याप्रमाणे निर्देशित केल्यानुसार, अधिनियमातील लागू तरतुदी आणि त्याअंतर्गत जारी केलेल्या परिपत्रकांचे पालन करून, वेळोवेळी सुधारित केल्याप्रमाणे, याद्वारे नोटीस दिली जाते की हस्तांतरण कंपनीचे भागधारक आणि असुरक्षित कर्जदार यांच्या स्वतंत्र बैठका घेतल्या जातील. व्हिडिओ कॉन्फरन्सिंग/इतर दृश्य/श्रव्य माध्यमांद्वारे **("व्हीसी/ओएव्हीएम")** कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांनी विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार, खाली नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार, शेअरधारक आणि असुरक्षित कर्जदारांनी या दिलेल्या दिवशी आणि वेळी हस्तांतरण कंपनीला उपस्थित राहण्याची विनंती केली जाते:

| क्रमांक | बैठकीची श्रेणीवेळ | (इन्डियन स्टैन्डर्ड टाईम) | बैठकीची तारीख |
|---|---|---|---|
| 1. | भागधारक | सकाळी 11:15 | एप्रिल 22, 2024 |
| 2. | असुरक्षित कर्जदार | दुपारी 12:00 | एप्रिल 22, 2024 |

हस्तांतरण कंपनी कडून व्हीसी/ओएव्हीएम द्वारे वरील बैठकी दरम्यान रिमोट इलेक्ट्रॉनिक मतदान **("रिमोट ई-व्होटिंग")** आणि ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची सोय दिली गेली आहे. हस्तांतरण कंपनीने यासाठी सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड **("सीडीएसएल")** ची नियुक्ती केली आहे ज्यामुळे बैठकीदरम्यान रिमोट ई-व्होटिंग आणि ई-व्होटिंगची सोय उपलब्ध करून दिली आहे, जेणेकरून भागधारक आणि असुरक्षित कर्जदारांना नोटिस मध्ये दिल्याप्रमाणे योजनेचा विचार करता येईल आणि मंजूर करता येईल. त्याप्रमाणेच भागधारक आणि असुरक्षित कर्जदारांना व्हीसी/ओएव्हीएम द्वारे मीटिंगमध्ये उपस्थित राहण्यास आणि सहभागी होण्यासाठी सक्षम करण्यासाठी हे उपयोगाचे आहे. व्हीसी/ओएव्हीएम द्वारे मीटिंगमध्ये हजर होण्याच्या तपशीलवार सूचना, मीटिंगच्या आधी रिमोट ई-व्होटिंगद्वारे किंवा मीटिंग दरम्यान ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची पद्धत, बैठकीच्या नोटिसांमध्ये दिलेल्या नोटिसांमध्ये दिले आहेत. बैठकीच्या सुरुवातीच्या वेळेस, आवश्यक गणसंख्या उपस्थित नसल्यास, अशी बैठक 30 (तीस) मिनिटांनी पुन्हा सुरु केल्या जातील आणि त्यानंतर उपस्थित असलेल्या व्यक्तींना गणसंख्या आहे असे मानले जाईल.

उपरोक्त बैठकांच्या खाली नमूद केल्याप्रमाणे हे सूचना, त्यासोबत असलेल्या कागदपत्रांसह, पाठविण्यात आली आहे:

a. ज्या भागधारकांचे नाव हस्तांतरण कंपनीच्या रेकॉर्डमध्ये 5 ऑक्टोबर 2023 रोजी 20 मार्च 2024 रोजी ई-मेलद्वारे दिसते.

b. असुरक्षित कर्जदारांना, ज्यांचे नाव 5 ऑक्टोबर 2023 रोजी ट्रान्सफर कंपनीच्या रेकॉर्डमध्ये 20 मार्च 2024 रोजी ई-मेलद्वारे दिसते.

बैठकीची सूचना आणि योजनेची प्रत, कलम 230-232 अंतर्गत स्पष्टीकरणात्मक विधानासह कलम 102 सह वाचावे आणि कंपनी (तडजोड, व्यवस्था आणि एकत्रीकरण) नियम, 2016 च्या कायदा आणि नियम 6 च्या इतर लागू तरतुदी सुद्धा पाहणे/डाउनलोड करणे, हे हस्तांतरण कंपनीच्या साईट्स www.amns.in आणि सीडीएसएलच्या www.evotingindia.com या वेबसाइटवरून डाउनलोड करणे शक्य आहे. हे परिपत्र शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्या वगळता इतर सर्व दिवशी, हस्तांतर्ण कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून सकाळी 11:00 ते दुपारी 1:00 पर्यंत बैठकीच्या तारखेपर्यंत मिळू शकतात.

मतदानासाठी कट ऑफ तारीख (रिमोट ई मतदानासह) आणी ई मतदानासाठी दिलेली समयावधी वरील बैठकीसाठी याप्रकारे आहे:

| विशेष | भागधारकांची बैठक | असुरक्षित कर्जदारांची बैठक |
|---|---|---|
| कट ऑफ तारीख | ऑक्टोबर 5, 2023 | ऑक्टोबर 5, 2023 |
| रिमोट ई मतदान सुरुवात तारीख आणी वेळ. | शुक्रवार, एप्रिल 19, 2024 सकाळी 9:00 | शुक्रवार, एप्रिल 19, 2024 सकाळी 9:00 |
| रिमोट ई मतदान संपण्याची तारीख आणी वेळ | रविवार, एप्रिल 21, 2024 संध्याकाळी 5:00 | रविवार, एप्रिल 21, 2024 संध्याकाळी 5:00 |

बैठकीसाठी वर दिल्याप्रमाणे, रिमोट ई-व्होटिंगद्वारे मत देण्याची सुविधा, ही समाप्ती वेळेनंतर बंद केली जाईल. सभेच्या सुरुवातीच्या संबंधित सभेसाठी आवश्यक गणसंख्या उपस्थित नसल्यास, अशा सभा 30 (तीस) मिनिटांनी पुन्हा सुरु केल्या जातील आणि त्यानंतर उपस्थित असलेल्या व्यक्तींना गणसंख्या आहे असे मानले जाईल.

ज्या भागधारक /असुरक्षित कर्जदारांनी त्यांचा ई-मेल पत्ता नोंदणीकृत केलेला नाही आहे, अशा भागधारक/असुरक्षित कर्जदारांनी 5 एप्रिल 2024 रोजी दुपारी 2:00 (IST) पर्यंत किंवा त्यापूर्वी नोंदणीसाठी हस्तांतरण कंपनीशी संपर्क साधावा. श्री मनीष पारीख यांना cs.amnsgandhidham@amns.in वर ई-मेल करा. ई-मेलच्या यशस्वी नोंदणीनंतर, नोटीसची सॉफ्ट कॉपी आणि बैठकीमध्ये उपस्थित राहण्यासाठी तसेच रिमोट ई-व्होटिंग आणि मीटिंग दरम्यान ई-व्होटिंगसाठी लॉग इन क्रेडेन्शियल संबंधितांच्या अशा नोंदणीकृत भागधारक/असुरक्षित कर्जदार यांच्या ई-मेल पत्त्यावर पाठवले जातील.

ज्या भागधारकांची नावे 5 ऑक्टोबर 2023 रोजी हस्तांतरण कंपनीच्या नोंदींमध्ये आढळतात, त्यांनाच ई-व्होटिंगची सोय मिळण्याचा आणि भागधारकांच्या बैठकीला उपस्थित राहण्याचा अधिकार असेल. शेयरहोल्डर्सचे मतदानाचे अधिकार 5 ऑक्टोबर 2023 रोजी हस्तांतरण कंपनीच्या पेड-अप शेअर कॅपिटलमधील त्यांच्या धारणेच्या प्रमाणात असतील.

असुरक्षित कर्जदार, ज्यांची नावे 5 ऑक्टोबर, 2023 रोजी हस्तांतरण कंपनीच्या रेकॉर्डमध्ये आढळतील, त्यांनाच ई-व्होटिंगची सोय मिळण्याचा आणि असुरक्षित कर्जदारांच्या बैठकीला उपस्थित राहण्याचा अधिकार असेल. असुरक्षित कर्जदारांचे मतदानाचे अधिकार 5 ऑक्टोबर 2023 रोजी हस्तांतरण कंपनीच्या असुरक्षित कर्जदारांच्या थकबाकी मूल्य/ रकमेच्या प्रमाणात असतील.

एखादी व्यक्ती/संस्था जी 5 ऑक्टोबर 2023 पर्यंत भागधारक /असुरक्षित कर्जदार नाहीये, त्यांच्यासाठी ही सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने असणार आणी त्यांना मतदान करण्याचा आणि/किंवा मीटिंगमध्ये भाग घेण्याचा अधिकार असणार नाही.

बैठक व्हीसी/ओएव्हीएम द्वारे आयोजित केली जाणार असल्याने, बैठकीसाठी प्रॉक्सी नियुक्त करण्याची सोय नसणार. तथापि, बॉडी कॉर्पोरेट जो भागधारक किंवा असुरक्षित कर्जदार आहे, त्यांना रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याच्या उद्देशाने, मीटिंगमध्ये सहभागी होण्यासाठी अधिकृत प्रतिनिधी नियुक्त करण्याचा अधिकार आहे आ ण अशा बॉडी कॉर्पोरेट्सना योग्यरित्या स्कॅन केलेली प्रमाणित प्रत पाठवणे आवश्यक आहे (पीडीएफ फाइल) ज्यात संबंधित ठराव/अधिकारी पत्र स्क्रूटिनायझरला casakhala@gmail.com वर त्यांच्या नोंदणीकृत ई-मेल पत्त्यावरून हस्तांतरण कंपनीला त्याच्या ई-मेल पत्त्यावर चिन्हांकित केलेल्या प्रतसह त्यांच्या ईमेलवर cs.amnsgandhidham@amns.in, सभेच्या नियोजित वेळेच्या ४८ तास आधी पाठवणे गरजेचे असेल.

माननीय न्यायाधिकरणाने अडुकिया आणि एसोसियेट्स यांची नियुक्ती केली असून त्यांचे पर्यायी/अयशस्वी झाल्यास, श्री सुरेश कुमार, सेवानिवृत्त प्रशासनिक अधिकारी, यांची सभांचे अध्यक्ष म्हणून, त्यांच्या कोणत्याही तहकूब पुढे, माननीय न्यायाधिकरणाने सुश्री एस पी साखळे आणि कंपनीची नियुक्ती केली आहे, आणि त्यांना पर्यायी / अयशस्वी झाल्यास, कु. कोमल खडारिया, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी, यांची कोणत्याही तहकूब सह बैठकांसाठी स्क्रूटिनायझर म्हणून नियुक्ती केली आहे.

मीटिंगचे निकाल सभेच्या अध्यक्षांद्वारे, स्क्रूटिनायझरचा अहवाल मिळाल्यानंतर मीटिंग संपल्यापासून पंधरा (15) कार्यदिवसांत जाहीर केले जातील आणि ते CDSL च्या www.evotingindia.com या वेबसाइटवर प्रदर्शित केले जातील.

सीडीएसएल ई-व्होटिंग सिस्टीमद्वारे बैठकीमध्ये उपस्थित राहण्याबाबत आणि ई-व्होटिंगबाबत आपल्या काही शंका किंवा समस्या असल्यास, आपण helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल लिहू शकता किंवा 1800 22 55 33 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधू शकता.

स्वाक्षरी/-
**सुरेश कुमार**
माननीय न्यायाधिकरण यांनी नियुक्त केलेले सभांसाठीचे अध्यक्ष

**तारीख: 21 मार्च 2024**
**ठिकाण: चंडीगढ**

SMARTER STEELS BRIGHTER FUTURES

---

**SBI भारतीय स्टेट बँक** रिटेल ॲसेट क्रेडीट प्रोसेसिंग सेंटर, नाशिक.

**ताबा सुचना**

१ ला मजला, प्लॉट नं. पी/२४, सकाळ सर्कल जवळ, त्र्यंबक रोड, एमआयडीसी, सातपुर, नाशिक. ४२२००७. फोन नं. 0253-2223001/ 3026

**स्टेट बँक ऑफ इंडिया आर.ए.सी.पी.सी. नाशिक शाखा** याचे प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्सट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट,२००२ (कायदा २००२ चा क्र ३) कलम १३ (१२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ३ अन्वये, त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून खालील कर्ज घेणाऱ्यांना सदरहू सुचनेमध्ये नमुद केल्याप्रमाणे येणे असलेली नमुद रक्कम व प्रदानाच्या आणि/ किंवा वसुलीच्या तारखांपैकी, सदरहू सुचनेमध्ये नमुद केलेल्या तारखांपासून लागु व्याज, अनुषंगिक परिव्यय, खर्च, आकार इ. सह, प्रदान करण्यासाठी खालील कर्जदाराला मागणी सुचना सदर कायद्याच्या कलम १३(२) अन्वये निर्गमित केलेल्या आहेत. बँकेच्या सदर कर्जास तारण म्हणून खाली कर्ज घेतले त्यांच्या नावासमोर दर्शविलेली मालमत्ता बँकेकडे गहाण ठेवली आहे. तपशिल खालील प्रमाणे

| अ. क्र. | कर्जदार/ गहाणदाराचे नाव | थकबाकी रक्कम व ताबा प्रकार | मागणी सुचनेची तारीख | ताबा घेतल्याची तारीख | कर्जदाराचा पत्ता व संरक्षित केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन. |
|---|---|---|---|---|---|
| १ | सह कर्जदार सौ.विजया कारभारी खैरनार आणि कै.श्री.कारभारी बाबुराव खैरनार यांचे कायदकशीर वारसदार Top Up A/c No-38294923497 | ₹ १०,४०,३७२/- + दि. ३१.१०.२०२३ पासून चे व्याज | ३१-१०-२०२३ | १५-०३-२०२४ | फ्लॅट नं. ०३, पहिला मजला, श्री तिरूमला प्लाझा अपार्टमेंट, सर्व्हे नं. ३०५/अ/२, स्टट बँक ऑफ इंडिया लगत, उपेंद्र नगर, त्रिमुर्ती चौक, अंबड लिंक रोड, अंबड, नाशिक, ४२२०१०. यांसी क्षेत्र ७२.५० चौ.मी. यांसी चतुःसिमा पुर्वेस : साईड मार्जिन आणि १८ मी. रोड, पश्चिमेस : लॅंडींग, दक्षिणेस : फ्लॅट नं. ०४, उत्तरेस : साईड मार्जिन. |
| २ | कै. श्री. शरद संपत साळवे यांचे सर्व कायदेशीर वारस- पत्नी श्रीमती. राणी शरद साळवे उर्फ राणी अशोक खरात. मुलगा- स्वराज शरद साळवे, आई - सौ. जिजाबाई संपत साळवे Home Loan A/C No. 31570433910. | ₹ १५,७३,६५१/- + दि. १७.०८.२०२३ पासून चे व्याज | १७-०८-२०२३ | १५-०३-२०२४ | श्री. शरद संपत साळवे यांच्या मालकीची मिळकत- फ्लॅट नं. ०४, २रा मजला, श्रीपाद अपार्टमेंट, गट नं. ६४३/१/१, प्लॉट नं. ९, आडगांव शिवार, कोणार्क नगर समोर, स्वामी समर्थ मंदिरा जवळ, मुबई आग्रा रोड, आडगांव, नाशिक- ४२२००३. यांसी क्षेत्र ८१.७८ चौ.मी. यांसी चतुःसिमा पुर्वेस : मार्जिनल स्पेस, पश्चिमेस : मार्जिनल स्पेस, दक्षिणेस : कॉलनी रोड, उत्तरेस : फ्लॅट नं. ०५. |
| ३ | श्री. प्रकाश नामदेव आहेर आणि सौ. रेखा प्रकाश आहेर, Home Loan A/C No. 37137364131 & Suraksha Loan A/C No. 37137385118 | ₹ १३,९१,७११/- + दि. २६.१०.२०२३ पासून चे व्याज | २६-१०-२०२३ | १५-०३-२०२४ | श्री.प्रकाश नामदेव आहेर आणि सौ. रेखा प्रकाश आहेर यांच्या मालकीची मिळकत - फ्लॅट नं. ०४, तळ मजला, ए विंग, विहंग को ऑप हौ. सोसा. प्लॉट नं. २४ ते २७, आणि ३० ते ३३, स. नं. २६९/२+३+४/१+२+४/२४+२५+२६+२७+३०+३१+३२+३३, रुख्मिणी लॉन्स समोर, हनुमान नगर, अमृतधाम, पंचवटी, नाशिक. यांसी क्षेत्र ६१.८० चौ.मी. यांसी चतुःसिमा पुर्वेस : कॉलनी रोड, पश्चिमेस : फ्लॅट नं. ए३, दक्षिणेस : पार्किंग, उत्तरेस : मार्जिनल स्पेस. |

सदरहु उपरोक्त कर्ज घेणाऱ्यांनी देय रक्कम चुकती करण्यामध्ये कसुर केला असल्या कारणाने या द्वारे विशेषतः वरील संबंधीत कर्ज घेणाऱ्यांना आणि सर्व सामान्य जनतेस सुचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकर्त्यानी सदरहु अधिनियम कलम १३(४) सह वाचता सदरहु नियम ८ अन्वये वर नमुद कर्ज घेणाऱ्यांच्या नावा समोर दिलेल्या तपशिलाच्या मालमत्तेचा **ताबा** संबंधीत मालमत्तेच्या समोर दाखविलेल्या तारखेला घेतला आहे. उपरोक्त नमुद केलेले विशेषतः कर्जदार तसेच सर्वसामान्य जनतेस या सुचनेद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त नमुद मिळकत/ तारणयुक्त मालमत्तेच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचे व्यवहार करू नयेत आणि सदरहु मिळकत/ स्थावर मालमत्तेवर केलेला कोणताही व्यवहार हा वर नमुद केलेली देय रक्कम व त्यावर नमुद तारखेपासूनचे येणे व्याज तसेच इतर खर्चापोटी **स्टेट बँक ऑफ इंडिया आर.ए.सी.पी.सी. नाशिक शाखा** ला देय असलेल्या एकुण रकमेच्या आधिन राहील. संरक्षित मालमत्तेचा उपलब्ध वेळेच्या बाबतीत पुर्ततेकरिता कृपया सदर सरफेसी कायदा २००२ च्या सेक्शन १३ च्या उपकलम (८) मधील तरतुदींकडे कर्जदाराने लक्ष देणे.

वर नमुद केलेल्या कायद्यामध्ये तरतूद असलेला अधिकार तसेच नियम यांना अनुसरून बँकेने आता त्यांचा उपरोक्त तपाशिलाची स्थावर मालमत्ता विकून, बँकेने थकित कर्ज वसूल करण्याचे ठरविले आहे. दरम्यानच्या काळात बँकेतर्फे वर नमुद केलेले कर्जदार तसेच आवश्यक तेथे त्यांचे कयदेशिर वारस, प्रतिनिधी यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कडे देय असलेली बँकेची थकित रक्कम त्यावरील विहीत दराने उपरोक्त नमुद तारखांपर्यंतचे लागू झालेले तसेच त्यापुढील दिवसापासून लागू होणारे व्याज व इतर खर्च इ. तसेच मालमत्तेचा ताबा घेतल्यापासून त्यावर झालेला खर्च आणि इतर रक्कम सदर सुचना जाहीर झाल्यापासून जास्तीत जास्त ३० दिवसांचे आत भरून आपली स्थावर मालमत्ता बँकेच्या ताब्यातुन मुक्त करून घ्यावी. संबंधीत कर्जदार व त्यांचे कायदेशीर वारस, प्रतिनिधी यांनी उपरोक्त रक्कम दिलेल्या मुदतीत भरण्यास दुर्लक्ष किंवा टाळाटाळ केली तर खालील सही करणारे बँकेचे प्राधिकृत अधिकारी, वरील कायद्याच्या योग्य तरतुदींच्या तसेच त्यातील नियमांच्या आधारे कर्जदारांची मालमत्ता विकुन बँकेची देय रक्कम वसुल करतील व त्यांची जबाबदारी कर्जदार व त्यांचे वारस, प्रतिनिधी, जामिनदार यांच्यावर राहील.

ठिकाण : नाशिक
दिनांक : २०/०३/२०२४ (इंग्रजीतील मुळ सुचना ग्राह्य धरावी)

शिक्का

सही/- स्टेट बँक ऑफ इंडिया
प्राधिकृत अधिकारी

---

## वसुली अधिकाऱ्यांचे कार्यालय
### कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी ३),

१ला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्सचेंज बिल्डिंग, सेक्टर - ३० ए, वाशी, नवी मुंबई - ४००७०३

टीआरसी क्र. ४५०/२०१६

**विक्रीची उद्घोषणा: स्थावर मिळकत**

लिलाव विक्रीची तारीख : २६.०४.२०२४

रिकव्हरी ऑफ डेब्ट्स् ड्यु टू बँक ॲण्ड फायनान्शिअल इन्स्टिट्युशन्स ॲक्ट, १९९३ सहवाचता आयकर अधिनियम, १९६१ च्या दुसऱ्या परिशिष्टाच्या नियम ३८, ५२(२) अन्वये विक्रीची उद्घोषणा

**युनियन बँक ऑफ इंडिया विरुध्द निर्मला शांताराम ढगे आणि इतर**

प्रति,
सौ. निर्मला शांताराम ढगे, मुक्काम पोष्ट टिटवे, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक-४२२ २०२

ज्याअर्थी सन्माननीय पीठासिन अधिकारी, **कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)** यांनी संयुक्त आणि वेगवेगळे प्रक कडून खर्च आणि व्याजासह **रु. ७०,८३,४२१ (रुपये सत्तर लाख त्र्याऐंशी हजार चारशे एकवीस मात्र)** च्या रकमेच्या वसुलीसाठी वसुली प्रमाणपत्र **ओ.ए. क्र. ११६ सन २०१६ मधे टीआरसी क्र. ४५० सन २०१६** काढले आणि तुम्ही प्रक यांनी प्रमाणपत्र धारक बँक/वित्तीय संस्थेला थकबाकी चुकती करण्यास कसूर केली. आणि ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकारांनी सदर प्रमाणपत्राच्या पूर्ततेसाठी खालील परिशिष्टात वर्णन केलेली प्रमाणपत्र कर्जदारांची गहाण/जप्त केलेली मिळकत विकण्याचे आदेश दिले. सूचना याद्वारे देण्यात येते की जर पुढे ढकलण्याचा कोणताही आदेश नसल्यास सदर मिळकत लिलाव आणि बोलीने **२६.०४.२०२४ रोजी दु. १.०० ते दु. ०२.०० दरम्यान** विकण्यात येईल आणि बोली वेबसाईट: **http://www.bankeauctions.com** मार्फत ऑनलाईन/ऑफलाईन मार्फत करण्यात येईल. लिलाव सेवा पुरवठादारांकरिता प्राधिकृत संपर्क व्यक्तीचा तपशिल आहे, **नाव: श्री. भाविक पांड्या सी१ इंडिया प्रा. लि., मोबाईल क्र. ८८६६६८२९३७, ईमेल : support@bankeauction.com. लिलाव सेवा पुरवठादारांकरिता प्राधिकृत बँक अधिकाऱ्यांचा तपशिल आहे नाव श्री. संतोष कुमार चौबे, मोबाईल क्र. ९८७६८६५५९९, ई-मेल : ubin0550434@unionbankofindia.bank**, खालील परिशिष्टात वर्णन केल्याप्रमाणे उपरिनामित प्रतिवादी/प्रक च्या मिळकतीची विक्री आणि सदर मिळकतीशी निगडित दायित्वे आणि दावे, जो पर्यंत ते सुनिश्चित केले आहेत, ते प्रत्येक संचासमोर परिशिष्टात विनिर्दिष्ट केले आहेत. परिशिष्टांत विनिर्दिष्ट केलेल्या संचांमधील विक्रीसाठी मिळकत ठेवली जाईल. जर, मिळकतीच्या एखाद्या हिश्श्याच्या विक्रीतून रोकड झालेल्या रकमेतून देणे भागले तर, उर्वरित बाबतीत विक्री ताबडतोब थांबवली जाईल. जर, विक्री घेणाऱ्या अधिकाऱ्यांकडे सदर प्रमाणपत्रातील थकबाकी, व्याज, खर्च (विक्रीच्या खर्चासह) कोणत्याही संचाच्या विक्रीआधी जमा केली किंवा त्यांना पटेल असे प्रमाणपत्रातील रक्कम, व्याज+ व+खर्च निम्नस्वाक्षरीकारांकडे प्रदान केल्याचे पुरावे सादर केले तर ती विक्री देखील थांबविण्यात येईल. विक्रीसाठी सर्वसामान्य जनतेला एकतर व्यक्तीशः किंवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत आमंत्रित करण्यात येत आहे. विक्रीशी संबंधित कोणतीही कृती करणारे कोणतेही अधिकारी किंवा अन्य व्यक्ती थेट किंवा अप्रत्यक्षपणे विकावयाच्या मिळकतीसाठी बोली, संपादन किंवा कोणतेही हितसंबंध संपादित करू शकणार नाहीत. विक्री आयकर अधिनियम, १९६१ च्या दुसऱ्या परिशिष्टात विहित अटी आणि त्याअंतर्गतचे नियम आणि खालील शर्तींच्या अधीन होईल. **I.** जोडलेल्या परिशिष्टांत विनिर्दिष्टीत केलेले तपशील निम्नस्वाक्षरीकारांच्य सर्वोत्तम समजुतीप्रमाणे कळवले आहेत परंतु, उद्घोषणेतील कोणत्याही त्रुटी, गैरविधाने किंवा उणिवांसाठी निम्नस्वाक्षरीकार उत्तर देण्यास बांधील नसतील. **II.** जिच्या खाली मिळकत विकली जाणार नाही ती राखीव किंमत परिशिष्टांत दिली आहे. **III.** किती रकमेने बोली वाढवायची ती नमूद केली आहे. बोली लावलेली रक्कम किंवा बोलीदार याबद्दल कोणताही विवाद उद्भवल्यास तो संच पुन्हा लिलावात ठेवला जाईल किंवा रद्द केला जाईल. **IV.** सर्वोच्च बोलीदाराला कोणत्याही संचाचे खरेदीदार म्हणून तेव्हाच घोषित केले जाईल जर तो/ती/ते बोलीसाठी पात्र असतील तसेच त्याने/तीने/त्यांनी लावलेल बोलीची रक्कम राखीव किंमती पेक्षा कमीन नसेल. देऊ केलेली रक्कम पुरेशी नसल्याने स्विकारण्यासारखी नसल्याचे सरळ सरळ दिसत असल्यास सर्वोच्च बोली स्विकारण्यास नकार देण्याचा स्वेच्छानिर्णय निम्नस्वाक्षरीकार घेऊ शकतात. **V.** प्रत्येक इच्छुक बोलीदारांनी इसारा अनामत रक्कम (इअर) चे प्रदान **वसुली अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी ३)** च्या नावातील डीडी/पे ऑर्डर द्वारा करावे जे आरओ/कोर्ट ऑक्शनर, **कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी ३)** यांच्याकडे जमा करावे किंवा ऑनलाईन पद्धतीने आरटीजीएस/एनईएफटी मार्फत/थेट **खाते क्र. १०४३०१०००२२९४५, बँक ऑफ बडोदा च्या नावात आयएफएससी कोड क्र. BARB0VASHIX** मध्ये जमा करावी व मिळकतीचे तपशिलासह, पॅन कार्ड ची प्रत, पत्ता पुरावा आणि ओळखीचा पुरावा, ईमेल आयडी, मोबाईल क्र. आणि कंपनी असल्यास कंपनीचे ॲटर्नी/प्रतिनिधीत्वास संमती देणारे अन्य कोणतेही दस्तावेज जमा करावेत व असे जमा करण्याची पावती/काऊंटर फॉईल सादर करावी. त्यानंतर जमा केलेली इअर लिलावात सहभागासाठी पात्र समजली जाणार नाही.

**इसारा अनामत रक्कम (इ.अ.र.) राखीव किंमत आणि बोली वाढीची रक्कम खालीलप्रमाणे निश्चित केलेली आहे :**

| अ. क्र. | मिळकतीचे तपशील | इसारा रक्कम (रु.त) | राखीव किंमत (रु.त) | बोली वाढीची रक्कम च्या पटीत (रु.त) |
|---|---|---|---|---|
| १ | गाव टिटवे, तालुक दिंडोरी, जिल्हा नाशिक येथे स्थित शेत जमीन गट क्र. ४०/१, मोजमापित २एच ६१आर चे सर्व ते भाग आणि विभाग. | ७,९०,००० | ७९,००,००० | २५,००० |

नियत तारीख आणि वेळेनंतर प्राप्त होणारी इ.अ.र. फेटाळली जाईल आणि इ.अ.र. पोटी प्रदान केलेली रक्कम ई-लिलाव प्रपत्रात त्यांनी दिलेल्या पर्यायानुसार परत केली जाईल. बोली प्रक्रियेत सहभागी होण्यास इच्छुक असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे सक्षम प्राधिकाऱ्यांनी जार केलेली वैध डिजीटल सिग्नेचर प्रमाणपत्र असले पाहिजे. बोलीमध्ये त्याला/तिला भाग घेणे शक्य व्हावे म्हणून सदर डिजीटल सिग्नेचर प्रमाणपत्र, ॲक्टीव्ह जीमेल आयडी व इंटरनेट कनेक्शनसह कॉम्प्युटर टर्मिनल/सिस्टीम मिळवण्याची जबाबदारी बोलीदारांची असेल. ऑनलाईन बोलीच्या वेळेत डिजीटल सिग्नेचर प्रमाणपत्र आणि कनेक्टीव्हीटी संबंधातील कोणत्याही समस्या बोलीदारांनी सोडवायच्या आहेत आणि ह्या बाबतीत कोणतेही दावे विचारांत घेतले जाणार नाहीत. लिलावाच्या दिलेल्या वेळेच्या शेवटच्या ५ मिनिटांत बोली वाढवल्यास अन्य बोलीदारांना त्यांच्य बोली वाढवणे शक्य व्हावे म्हणून ५ मिनिटांच्या अतिरिक्त वेळेने लिलावाची वेळ वाढवली जाईल आणि अशा वाढीव ५ मिनिटांच्या वेळेत कोणतीही वाढ केली नाही तर लिलाव प्रक्रिया समाप्त होईल. जंगम/स्थावर मिळकतीच्या बाबतीत प्रत्येक संचाची किंमत विक्रीच्या वेळेस किंवा विक्री करणाऱ्या अधिकाऱ्याच्या निर्देशांनुसार त्यानंतर लगेच प्रदान करावी, आणि प्रदानात कसुर केल्यास मिळकत पुन्हा विक्रीसाठी लिलावासाठी ठेवली जाईल. यशस्वी बोलीदारांना विक्रीची २५% किंमत इ.अ.र. समायोजित करून विक्री निश्चित झाल्याच्या पुढील दिवसापर्यंत वरील तपशिलानुसार सदर खात्यात/डिमांड ड्राफ्ट/बँकर चेक/पे ऑर्डर ने प्रदान करावी लागेल. जर पुढील दिवस सुट्टी किंवा रविवार असेल तर त्या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी प्रदान करावी लागेल. खरेदीदारांनी विक्रीची उर्वरित ७५% रक्कम विक्रीच्या तारखेपासून १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी प्रदान करावी आणि १५ वा दिवस रविवार किंवा अन्य सुट्टी असेल तर वरील विहित स्वरुपात १५ व्या दिवसानंतरच्या पहिल्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी प्रदान करावी लागेल. वरील व्यतिरिक्त खरेदीदारांना वसुली अधिकारी, **कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी ३) यांच्याकडे रु. १,०००/ पर्यंत २% दराने आणि रु. १,०००/- च्या सदर रकमेपेक्षा जास्त असल्यास १% दराने पाऊंडेज फी डीडी द्वारा रजिस्ट्रार, कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी ३) च्या नावे जमा करावी लागेल.** विहित मुदतीत प्रदानात कसुर केल्यास, विक्रीचे खर्च भागवून, जमा केलेली रक्कम निम्नस्वाक्षरीकारांना योग्य वाटल्यास सरकारकडे जप्त केली जाईल आणि कसुरवार खरेदीदारांना मिळक